दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आजचे पंचांग

दिनांक: ३ नोव्हेंबर २०२६ वार: मंगळवार मास (अमावस्यांत): आश्विन मास (पूर्णिमांत): कार्तिक पक्ष: कृष्ण पक्ष तिथी: नवमी तिथी (सकाळी ११:५४ पर्यंत) त्यानंतर दशमी तिथी नक्षत्र: मघा नक्षत्र (४ नोव्हेंबर पहाटे ०३:२६ पर्यंत) त्यानंतर पूर्वा फाल्गुनी नक्षत्र योग: शुक्ल योग (सकाळी ०९:५३ पर्यंत) त्यानंतर ब्रह्म योग करण: गराजा करण (सकाळी ११:५४ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण चंद्र राशी: सिंह राशी सूर्य राशी: तूळ राशी सूर्योदय: सकाळी ०६:४१ सूर्यास्त: सायंकाळी ०६:०३

प्रशांत चौधरी यांना रोहिणी नय्यर पुरस्कार!

पुणे । प्रतिनिधी

तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी मोठी शहरे, महागडे संगणक आणि इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक असल्याची समजूत मोडून काढणाऱ्या डेहराडूनमधील प्रशांत चौधरी यांना यंदाचा पाचवा रोहिणी नय्यर पुरस्कार जाहीर झाला आहे. ग्रामीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. आयआयटीमधून पदवी घेतल्यानंतर स्वतःच्या गावातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे देण्यापासून त्यांनी या उपक्रमाची सुरुवात केली होती.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ४० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

अयोध्या राम मंदिर दान चोरी प्रकरण: सीबीआय चौकशीच्या याचिका फेटाळल्या

यूपी निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली / प्रतिनिधी

अयोध्या येथील भव्य राम मंदिरातील दान चोरीच्या बहुचर्चित प्रकरणाला एक महत्त्वाचे वळण मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या सर्व याचिका नुकत्याच निकाली काढल्या आहेत. उत्तर प्रदेशच्या विशेष तपास पथकाने या प्रकरणात रीतसर आरोपपत्र दाखल केल्याची माहिती समोर आल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. मात्र, आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये या मुद्द्यावरून तीव्र राजकीय संघर्ष पेटण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

एसआयटी तपास आणि धक्कादायक बाबी

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, राम मंदिराच्या देणगी मोजणी कक्षातच (ऊॅपीळपस डींरसश) पैशांची पद्धतशीर अफरातफर झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मंदिरातील पैसे मोजणाऱ्या काही कर्मचाऱ्यांनीच ही चोरी करून तो पैसा मालमत्ता खरेदी आणि बँक खात्यांमध्ये वळवला आहे. एसआयटीला अशा तब्बल १०७ घटना आढळल्या आहेत, जिथे देणगी कक्षातून पैसे अनधिकृतपणे लांबवले गेले. या प्रकरणात एसआयटीने एकूण ८ आरोपींची ओळख पटवून २३ सप्टेंबर रोजीच अयोध्या येथील स्थानिक न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. तसेच, मंदिरातील सर्व मौल्यवान वस्तू आणि एकूण चढावा सुरक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आता या प्रकरणाची पुढील सुनावणी आणि खटला संबंधित ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट कोर्टासमोर नियमांनुसार चालवला जाईल. या प्रकरणाशी जनहित जोडलेले असल्याने, याचिकाकर्ते गुन्ह्यातील पीडितांप्रमाणे मॅजिस्ट्रेट कोर्टाला साहाय्य करू शकतील, असे न्यायालयाने नमूद केले. मात्र, या प्रकरणाच्या गुणवत्तेवर न्यायालयाने कोणतेही भाष्य केलेले नाही.

युपी निवडणुकीच्या तोंडावर राजकीय पडसाद

सध्या उत्तर प्रदेशमध्ये निवडणुकांचे वातावरण तापले असताना, राम मंदिरातील देणगी चोरी आणि सीबीआय चौकशीची मागणी फेटाळली जाणे याला मोठा राजकीय रंग चढू शकतो. विरोधी पक्षांनी या प्रकरणावरून सत्ताधाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचे अस्त्र उगारण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे, एसआयटीने वेळेत आणि निष्पक्षपणे तपास करून आरोपपत्र दाखल केल्यामुळे, कायदेशीर मार्गाने योग्य ती कारवाई होत असल्याचे सरकारकडून स्पष्ट केले जात आहे.

धार्मिक आणि संवेदनशील असलेल्या या मुद्द्यावर सीबीआय चौकशीची मागणी फेटाळल्यामुळे न्यायालयीन लढा आता कनिष्ठ न्यायालयाच्या पातळीवर सरकला असला, तरी आगामी निवडणुकीच्या मैदानात हा विषय विरोधकांसाठी प्रचाराचे प्रमुख शस्त्र ठरण्याची दाट शक्यता आहे.

२०० कोटींच्या खंडणी प्रकरणात नोरा फतेहीला पुन्हा समन्स; न्यायालयाने गैरहजेरीवर व्यक्त केली नाराजी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली : प्रतिनिधी

कुख्यात आरोपी सुकेश चंद्रशेखर याच्याशी संबंधित सुमारे २०० कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात अभिनेत्री नोरा फतेही हिच्या अडचणी वाढल्या आहेत. दिल्लीतील न्यायालयाने तिला पुन्हा एकदा समन्स बजावत ६ नोव्हेंबर रोजी साक्षीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश गगनदीप सिंह यांनी सोमवारी (२ नोव्हेंबर) हे नवे समन्स जारी केले. यापूर्वी समन्स बजावूनही नोरा फतेही न्यायालयात उपस्थित राहिली नसल्याने न्यायाधीशांनी तिच्या गैरहजेरीबद्दल नाराजी व्यक्त केली.

या प्रकरणात सुकेश चंद्रशेखर याच्यावर सुमारे २०० कोटी रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान नोरा फतेहीचे नाव समोर आले असून, ती या खटल्यात साक्षीदार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

न्यायालयीन प्रक्रियेत साक्षीदारांची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे वारंवार गैरहजेरीची दखल घेत न्यायालयाने पुन्हा समन्स बजावले आहे. आता ६ नोव्हेंबरला नोरा फतेही न्यायालयात उपस्थित राहते का आणि तिच्या साक्षीतून या प्रकरणातील कोणते नवे तपशील समोर येतात, याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, नोरा फतेहीला या प्रकरणात साक्षीदार म्हणून बोलावण्यात आले आहे; तिच्यावर या खंडणी प्रकरणात आरोपी असल्याचा निष्कर्ष या समन्समधून निघत नाही.

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी भाजपची फिल्डिंग; सुनेत्रा-पार्थ यांना बाजूला सारण्याची रणनीती?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
दिल्ली / वृत्तसंस्था



महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चेने पुन्हा राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आणून त्यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामावून घेण्यासाठी भाजपनेच पुढाकार घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र, या कथित राजकीय जुळवाजुळवीत सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांना बाजूला ठेवण्याची रणनीती आखली जात असल्याच्या चर्चेने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोमवारी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, समीर भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत विलीनीकरण, पक्षाचे नेतृत्व आणि सत्तेतील वाटा यावर चर्चा झाल्याचे सांगितले जाते. संभाव्य विलीनीकरणानंतर राष्ट्रवादीला केंद्रात दोन मंत्रिपदे देण्याची तयारी भाजपने दर्शविल्याचीही चर्चा आहे. मात्र, राष्ट्रवादीत सर्व काही आलबेल नाही. सुनेत्रा पवार यांच्यासाठी अर्थखात्याची मागणी आणि पार्थ पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या महत्त्वाकांक्षेची चर्चा आहे. दुसरीकडे ज्येष्ठ नेत्यांनाही पक्षातील निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचा वाटा हवा आहे.

दरम्यान, उमेश पाटील यांनी मतभेदांचे वृत्त फेटाळले असून, अमित शाह यांच्यासोबतची बैठक पूर्वनियोजित असल्याचे स्पष्ट केले.

३४ हजार न्यायालयीन कर्मचारी गुरुवारी संपावर; न्यायालयांचे कामकाज ठप्प होण्याची शक्यता!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
मुंबई / प्रतिनिधी

राज्यातील न्यायालयीन व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असलेले सुमारे ३४ हजार ७०० कर्मचारी आता सरकारविरोधात रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्याप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही समान वेतन मिळावे, या मागणीसाठी गुरुवारी, ७ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील कर्मचारी सामूहिक रजेवर जाणार आहेत. त्यामुळे न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

समान वेतनाच्या मागणीसाठी कर्मचारी संघटनांनी यापूर्वीही आंदोलनाचा मार्ग स्वीकारला होता. ६ सप्टेंबर रोजी एक दिवसाचे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम केले. मात्र, सरकारकडून ठोस निर्णय न झाल्याने आता सामूहिक रजेचे अस्त्र उपसण्यात येत आहे.

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, जानेवारी २०२५ मध्ये उच्च न्यायालयाने राज्य सरकारला यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अद्याप अहवाल सादर करण्यात आलेला नसल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. ७ नोव्हेंबरच्या आंदोलनानंतरही मागण्या मान्य न झाल्यास १६ नोव्हेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील न्यायालयांना बॉम्बने उडवण्याच्या धमक्या; न्यायव्यवस्थेत भीतीचे वातावरण!

ठाणे ते बीड, सांगली ते परभणी न्यायालयांना धमकीचे ई-मेल; न्यायाधीश, वकील आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
पुणे / प्रतिनिधी

महाराष्ट्रातील न्यायालयांनाच बॉम्बस्फोटाने उडवून देण्याच्या धमक्या मिळाल्याने राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेची झोप उडाली आहे. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी आणि हिंगोलीसह अनेक जिल्हा न्यायालयांना धमकीचे ई-मेल पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एकाच वेळी अनेक न्यायालयांना लक्ष्य करण्यात आल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे.

न्यायालयांच्या अधिकृत ई-मेलवर धमकीचे संदेश मिळताच प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने न्यायालय परिसराचा ताबा घेतला. खबरदारी म्हणून न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि न्यायालयीन कामासाठी आलेल्या नागरिकांना इमारतीबाहेर सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

बॉम्बशोधक आणि नाशक पथकांना पाचारण करून न्यायालयांच्या इमारती, कक्ष आणि परिसराची तपासणी करण्यात आली. काही ठिकाणी खबरदारी म्हणून न्यायालयीन कामकाज तात्पुरते थांबवण्यात आले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे पक्षकार आणि वकिलांची मोठी धावपळ उडाली.

धमकीचे ई-मेल कुठून पाठवण्यात आले? त्यामागे नेमके कोण आहे? हा केवळ खोडसाळपणा आहे की प्रत्यक्ष घातपाताचा कट? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

सायबर यंत्रणा आणि पोलिसांकडून ई-मेलचा स्रोत शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. न्यायव्यवस्थेच्या सुरक्षिततेलाच आव्हान देणाऱ्या या प्रकाराामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेच्या सज्जतेची कसोटी लागली आहे.

शरद पवार रुग्णालयात दाखल; दुष्काळग्रस्तांच्या भेटीचा दौरा रद्द

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
पुणे / प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सोमवारी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. गेल्या दोन दिवसांपासून सतत खोकल्याचा त्रास होत असल्याने त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आल्याची माहिती आहे. त्यांच्या रुग्णालयातील दाखल होण्यामुळे नियोजित दुष्काळ दौऱ्यालाही ब्रेक लागला आहे.

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करत होते. शेतकऱ्यांच्या अडचणी, पाण्याची टंचाई आणि शेतीच्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुढील दौरा रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी व्हॉट्सॲप स्टेटसच्या माध्यमातून शरद पवार यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल केल्याची माहिती दिली. त्यांच्या काही वैद्यकीय चाचण्या सुरू असून प्रकृती उत्तम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवार नियमित वैद्यकीय तपासणीसाठीही या रुग्णालयात जात असतात. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सुरू असलेल्या त्यांच्या दौऱ्याला तात्पुरता विराम मिळाल्याने पुढील राजकीय आणि शेतकरी आंदोलनाच्या घडामोडींकडे लक्ष लागले आहे.

न्याय व्यवस्थेतील सुधारणा: केवळ तंत्रज्ञान पुरेसे की आणखी गांभीर्याने धोरणात्मक बदलांची गरज?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारताच्या न्याय व्यवस्थेत प्रलंबित खटल्यांचा डोंगर (५.८ कोटींहून अधिक) आणि न्याय मिळण्यास होणारा विलंब ही केवळ प्रशासकीय समस्या नसून, ती सामान्य नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली करणारी गंभीर विसंगती बनली आहे. 'युपीआय' किंवा डिजिटल क्रांतीसारखे तंत्रज्ञान न्याय व्यवस्थेला गतिशीलता देऊ शकते यात शंका नाही, परंतु केवळ डिजिटल मंचावर खटले नेल्याने ही पोकळी भरणार नाही; त्यासाठी नैतिक, संरचनात्मक आणि मानवी पातळीवर व्यापक सुधारणांची तातडीची गरज आहे.

१. डिजिटल सुधारणांच्या मर्यादा आणि मानवी घटकाची गरज

तंत्रज्ञानाचा वापर प्रक्रियेला पारदर्शक आणि वेगवान बनवू शकतो, जसे की 'ई-कोर्ट' प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) डरे कागदपत्रांचे भाषांतर आणि ऑनलाइन सुनावण्या. परंतु, जोपर्यंत न्यायालयीन प्रक्रियेत मानवी संवेदनशीलता, न्यायमूर्तींची वाढ, आणि नैतिक बांधिलकी जोडली जात नाही, तोपर्यंत डिजिटल क्रांती केवळ 'डिजिटल कागदपत्रांचा ढीग' तयार करेल.

खटल्यांची सुनावणी वेळेत पूर्ण करण्यासाठी न्यायाधीश आणि वकिलांची कार्यसंस्कृती बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

२. न्यायाधीशांची प्रचंड कमतरता आणि पायाभूत सुविधा

भारतामध्ये लोकसंख्येच्या न्यायाधीशांचे प्रमाण अत्यंत अपुरे आहे (दर १० लाखांमागे जेमतेम २०-२१ न्यायाधीश). जोपर्यंत नवीन न्यायालयांची स्थापना होत नाही आणि रिक्त पदे युद्धपातळीवर भरली जात नाहीत, तोपर्यंत ५.८ कोटी खटल्यांचा निपटारा होणे अशक्य आहे. केवळ सर्वोच्च स्तरावर सल्लागार समिती नेमण्यापेक्षा तळागाळातील न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि आधुनिक साधनसामग्री पुरवणे गरजेचे आहे.

३. 'तारीख पे तारीख' संस्कृतीला आळा आणि नैतिक उत्तरदायित्व

न्याय प्रक्रियेत वारंवार तारखा देण्याची जुनी सवय खटला लांबणीवर टाकण्याचे प्रमुख कारण आहे. कायदेतज्ज्ञांनी सुचवल्याप्रमाणे, अनावश्यक स्थगनांवर (Adjournments) कायदेशीर रित्या कडक निर्बंध घातले पाहिजेत. खटल्यांच्या सुनावणीसाठी कालमर्यादा (Timeframe) ठरवून देणे आणि त्याचे तंतोतंत पालन न झाल्यास संबंधित घटकांवर नैतिक व प्रशासकीय जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

४. पर्यायी विवाद निवारण (ADR) आणि लोकअदालतचे बळकटीकरण

न्यायालयात खटला दाखल होण्यापूर्वीच स्थानिक पातळीवर किंवा मध्यस्थी केंद्रांडरे (Mediation) वाद मिटवण्याला प्रोत्साहन दिल्यास न्यायालयांवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकतो. यासाठी 'राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण' (NALSA) सारख्या संस्थांना केवळ आर्थिक निधीच नव्हे, तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि लोकजागृतीची जोड देणे गरजेचे आहे. जेणेकरून सामान्य नागरिक न्यायालयाच्या चक्रव्यूहात अडकण्याऐवजी परस्पर संमतीने न्याय मिळवू शकतील.

५. संविधानिक बांधिलकी आणि नैतिक न्यायव्यवस्था

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३९अ नुसार प्रत्येक नागरिकाला मोफत आणि समान न्याय मिळण्याचा अधिकार आहे. हा अधिकार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात आणण्यासाठी संपूर्ण न्यायव्यवस्थेने पारदर्शक, उत्तरदायी आणि नैतिक दृष्टिकोन स्वीकारण्याची वेळ आली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, 'युपीआय'सारखी डिजिटल क्रांती न्याय व्यवस्थेला निश्चितच गती देऊ शकते, परंतु नैतिक मूल्ये, पायाभूत सुविधांची पूर्तता, न्यायाधीशांची वाढती संख्या आणि प्रक्रियेतील पारदर्शकता यांच्याशिवाय ही सुधारणा अपुरी ठरेल. न्यायव्यवस्था ही केवळ कायद्याचे पालन करणारी यंत्रणा नसून ती मानवी अधिकारांचे रक्षण करणारा नैतिक स्तंभ आहे.

या विषयाशी संबंधित अधिक सखोल माहितीसाठी तुम्हाला खालीलपैकी काय जाणून घ्यायला आवडेल?

* भारताच्या न्याय व्यवस्थेतील न्यायाधीशांचे प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय तुलना.
* पर्यायी विवाद निवारण (ADR) आणि मध्यस्थी कायद्याची सद्यस्थिती.

संपादकीय

खुर्च्या मोजणाऱ्यांची नजर आणि देशाचे प्रश्न: उत्तरदायित्व कुणाचे?

देशात सगळं काही आलबेल असल्याचा आभास निर्माण केला जात आहे! बेरोजगारीचा प्रश्न नाही, महागाईचे संकट नाही, शेतकऱ्यांच्या व्यथा नाहीत, सीमेवर चीनच्या हालचालींची चिंता नाही आणि निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हच नाही! जर सगळंच सुजलाम सुफलाम असेल, तर मग सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी करायचं तरी काय? अशा वेळी विरोधकांच्या, विशेषतः राहुल गांधींच्या सभेत किती लोक आले, किती खुर्च्या रिकाम्या राहिल्या आणि किती जण सभेतून निघून गेले, याची मोजदाद करण्यातच आपली ऊर्जा खर्च करणे, हेच सध्याच्या राजकीय संस्कृतीचे वास्तव बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पक्षाला आज देशासमोरील ज्वलंत प्रश्नांपेक्षा विरोधकांच्या सभेतील गर्दीची चिंता अधिक आहे, हे दुर्दैवी आहे.

दिल्लीच्या रामलीला मैदानावर राहुल गांधी आणि 'इंडिया' आघाडीने मतचोरीच्या आणि लोकशाहीच्या मुद्यावर घेतलेली सभा असो वा अन्य राजकीय घडामोडी असो, सत्ताधारी पक्षाकडून नेहमीच गर्दी कमी असल्याचा दावा केला जातो. खुर्च्यांचे फोटो झळकवत पत्रकार परिषदा घेतल्या जातात. देशात लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आल्याचे प्रश्न उपस्थित होत असताना, निवडणूक प्रक्रियेवर संशयाचे काळे ढग दाटले असताना, भाजपचा संपूर्ण राजकीय अभ्यास मात्र 'खुर्च्यांच्या गणितावर' येऊन ठेपला आहे. वा रे वा! लोकशाहीचे प्रश्न गौण ठरवून गर्दी मोजण्यात धन्यता मानणाऱ्या या राजकारणात जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची हिंमत सरकार दाखवणार का, हा खरा कळीचा मुद्दा आहे.

आज देशासमोर काही मूलभूत आणि अत्यंत गंभीर प्रश्न उभे ठाकले आहेत. पहिला आणि सर्वात मोठा प्रश्न मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीचा आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेचा (ड्रखठ) आहे. मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळली जात असल्याचा गंभीर आरोप विरोधक करत असून, पात्र नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. महाराष्ट्र, बंगालपासून अनेक राज्यांत यावरून वादळ उठले आहे. जर मतदार याद्यांमध्ये सर्व काही पारदर्शक आहे, तर मग स्वतंत्र आणि निष्पक्ष तपासणीला एवढा विरोध कशासाठी? लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा आहे का? निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्याचा अधिकार फक्त सत्ताधाऱ्यांनाच आहे का?

दुसरा प्रश्न थेट निवडणूक आयोगाच्या आतील अनागोंदी कारभारावर प्रकाश टाकणारा आहे. खुद्द निवडणूक आयुक्त सुखबीरसिंह संधू आणि विवेक जोशी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवांना स्वतंत्र पत्रे लिहून प्रशासकीय बाबींवर आक्षेप घेतल्याची चर्चा आहे. देशाची निवडणूक व्यवस्था सांभाळणाऱ्या सर्वोच्च संस्थेतील आयुक्तांवर अशी पत्रे लिहिण्याची वेळ का आली? आयोग जर स्वायत्त असेल, तर या पत्रांमधील आक्षेप सार्वजनिक का केले जात नाहीत? आयोग ही लोकशाहीची घटनात्मक संस्था आहे की सत्ताधाऱ्यांच्या सोयीने चालणारी यंत्रणा? हा प्रश्न विचारण्याचा अधिकार जनतेला आहे.

तिसरा प्रश्न एसआयआरच्या नावाखाली मतदारांच्या अधिकारांशी खेळ चालल्याचा आहे. स्वच्छतेच्या नावाखाली पात्र मतदारांची नावे गायब झाली आणि सामान्य माणसाला स्वतःचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागले, तर ही कसली लोकशाही? कागदपत्रांच्या तांत्रिक मर्यादांमध्ये मतदारांना अडकवून त्यांची परीक्षा पाहण्याचा हा प्रकार थांबणार का?

चौथा प्रश्न देशातील वाढत्या गुन्हेगारी आणि लॉरेन्स बिश्नोईसारख्या टोळ्यांच्या जाळ्याशी संबंधित आहे. साबरमती तुरुंगात बंद असलेल्या गुन्हेगारावर नियंत्रण ठेवण्यात किंवा इतर राज्यांच्या पोलिसांना कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्यात जर केंद्राच्या निर्बंधांमुळे अडचणी येत असतील, तर गुन्हेगारी संपणार कशी? सरकारला विरोधकांच्या सभेतील गर्दी मोजायला वेळ आहे, पण गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करायला वेळ कधी मिळणार?

पाचवा आणि देशाच्या सुरक्षेचा अत्यंत संवेदनशील प्रश्न चीनच्या सीमेवरील हालचालींचा आहे. अरुणाचल प्रदेशातील सीमेवर चीनकडून रस्ते, गावे आणि पायाभूत सुविधांचा मोठा विस्तार सुरू असल्याच्या बातम्या वारंवार येत आहेत. मग भारताची प्रत्यक्ष तयारी काय आहे? सीमावर्ती नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकार काय करत आहे? या प्रश्नांची उत्तरे मागितली की लगेच देशविरोधी असल्याचा शिक्का मारणे कितपत योग्य आहे?

थोडक्यात सांगायचे तर, राहुल गांधींच्या सभेत किती खुर्च्या रिकाम्या होत्या, याचा हिशेब भाजपने सविस्तर लावला आहे. परंतु, निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर निर्माण झालेल्या प्रश्नांचा हिशेब कोण देणार? मतदारांच्या अधिकारांचे रक्षण कोण करणार? गुन्हेगारीला वेसण कधी घालणार? आणि चीनच्या आक्रमक धोरणावर सरकारची नेमकी भूमिका काय, हे जनतेला कधी समजणार?

भाजपला राहुल गांधींच्या सभेतील गर्दी कमी दाखवायची असेल तर खुशाल दाखवा, फोटो दाखवा आणि खुर्च्या मोजत बसा. पण एक विसरून चालणार नाही देश चालवण्यासाठी गर्दीचे फोटो पुरेसे नसतात, त्यासाठी उत्तरदायित्व लागते! राहुल गांधींच्या सभेत खुर्च्या रिकाम्या होत्या की भरलेल्या, हा सत्ताधाऱ्यांचा राजकीयकल असू शकतो; पण सरकारच्या धोरणांत आणि उत्तरांमध्ये जागा रिकाम्या का आहेत, हा सामान्य जनतेचा जाब आहे. आणि जनतेच्या प्रश्नांना बगल देऊन केवळ गर्दी मोजणारे सत्ताधारी हे विसरत आहेत की, निवडणुकांमध्ये खुर्च्या नाही, तर जनताच अंतिम आणि खात्रीशीर हिशेब करत असते!

शहराच्या स्वच्छतेचे खरे शिलेदार सफाई कर्मचारीच!

भगवत प्रसाद मकवाना यांचे प्रतिपादन; महर्षी वाल्मीकी विचार प्रबोधन पर्व २०२६ उत्साहात सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता सफाई कर्मचारी शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेत असतात. त्यांच्या निष्ठा, समर्पण आणि परिश्रमांमुळेच शहराला स्वच्छतेच्या क्षेत्रात नावलौकिक मिळतो. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या कामाचा सन्मान करणे, त्यांच्या योगदानाची दखल घेणे आणि त्यांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष भगवत प्रसाद मकवाना यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित 'महर्षी वाल्मीकी विचार प्रबोधन पर्व २०२६' चे उद्घाटन मकवाना यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चाचे उपाध्यक्ष धनराज बीर्दा, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आरोग्य विभाग तक्रार निवारण समितीचे माजी उपाध्यक्ष ॲड. सागर चरण यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

मकवाना म्हणाले, महर्षी वाल्मीकी यांनी आपल्या विचारांतून समाजाला समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून समाजातील प्रत्येक घटकाला सन्मान आणि



समान संधी मिळणे आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या स्वच्छतेसाठी आणि राज्यात स्वच्छतेच्या क्षेत्रात अव्वल स्थान मिळविण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत. त्यांच्या योगदानामुळेच शहराच्या स्वच्छतेचा लौकिक वाढत आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, स्वच्छ सर्वेक्षणामध्ये पिंपरी-चिंचवड शहराने राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्यामागे प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याचे योगदान महत्त्वाचे आहे. कर्मचाऱ्यांच्या मेहनतीसोबतच नागरिकांचे सहकार्यही शहराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक आहे. सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण यांना महापालिका प्राधान्य देत असून, नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

कर्मचाऱ्यांचा सन्मान, सुरक्षितता आणि सर्वांगीण कल्याण लक्षात घेऊन ओडिशा शासनाच्या 'गरिमा' योजनेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्वतंत्र योजना सुरू करण्याचे नियोजन असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

१९ कर्मचाऱ्यांना हक्काची घरे; १७ जणांना नियुक्तीपत्रे

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेअंतर्गत २५ वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या १९ कर्मचाऱ्यांना घरांचे वाटप करण्यात आले. तसेच १७ कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासोबतच त्यांना हक्काचे घर आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

उपमहापौर शर्मिला बाबर, उपआयुक्त अण्णा बोदडे आणि अखिल वाल्मीकी समाज, पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष राजेश बडगुजर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

सांस्कृतिक कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

महर्षी वाल्मीकी विचार प्रबोधन पर्वानिमित्त नागरिकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदाबहार गीतांच्या सुरेल कार्यक्रमातून जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. महिलांसाठी विशेष लावणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पारंपरिक मराठी लोककला, गीत-संगीताच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

वाढदिवसाचा खर्च टाळून दुष्काळग्रस्तांच्या दिवाळीसाठी आमदार अमित गोरखे यांचा पुढाकार

मराठवाडा आणि अहिल्यानगरमधील दुष्काळग्रस्त गावे, आदिवासी पाड्यांवर अन्नधान्य व दिवाळी फराळाचे वाटप

■ पिंपरी : प्रतिनिधी

वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि आदिवासी कुटुंबांची दिवाळी गोड करण्यासाठी विधान परिषद आमदार अमित गोरखे यांनी पुढाकार घेतला आहे. वाढदिवसाचा जल्लोष करण्याऐवजी मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावे व आदिवासी पाड्यांवर अन्नधान्य, दिवाळी फराळ आणि जीवनावश्यक साहित्याच्या किटचे वाटप करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर वैयक्तिक आनंदापेक्षा गरजू कुटुंबांच्या मदतीला प्राधान्य देत आमदार गोरखे यांनी हा सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. दुर्गम भागातील आदिवासी बांधवांसह संकटग्रस्त कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दिवाळीचा आनंद गरजू कुटुंबांपर्यंत

वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यातून गरजूंच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत अन्नदात्याच्या कुटुंबांनाही सणाचा आनंद घेता यावा, यासाठी समाजातील प्रत्येकाने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. वाढदिवसावर होणारा खर्च टाळून तो पैसा दुष्काळग्रस्त शेतकरी आणि गरजूंपर्यंत पोहोचवणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. आज आपला अन्नदाता संकटात आहे. या कठीण काळात आपण सर्वांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. यंदाची दिवाळी दुष्काळग्रस्त भागातील कुटुंबांसोबत साजरी करण्याचा आमचा मानस आहे. प्रत्येकाने आपापल्या परीने शक्य ती मदत करून बळीराजाची दिवाळी गोड करावी, असे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी केले.

फिडेल सॉफ्टटेककडून सॉफ्टेंजर कंपनीच्या अधिग्रहणाची घोषणा

■ पिंपरी : प्रतिनिधी

जपानमधील तंत्रज्ञान सेवा आणि भाषा सोल्युशन्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या फिडेल सॉफ्टटेक लिमिटेडने सॉफ्टेंजर आणि तिच्या समूह कंपन्यांच्या धोरणात्मक अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केल्याची घोषणा केली आहे. या अधिग्रहणामुळे फिडेलचा जागतिक विस्तार अधिक सक्षम होण्याबरोबरच आशियातील बाजारपेठांमधील उपस्थिती आणि तंत्रज्ञान सेवा पुरविण्याची क्षमता वाढणार आहे.

सॉफ्टेंजर ही भारत, सिंगापूर, मलेशिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये (यूएई) कार्यरत असलेली आयटी सेवा कंपनी असून तिचा वार्षिक महसूल सुमारे २०० कोटी रुपये आहे. आयटी इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट, सायबर सिक्युरिटी, डेटा सेंटर सपोर्ट, एंटरप्राइझ टेक्नॉलॉजी सपोर्ट आणि मॅनेज्ड सर्व्हिसेस या क्षेत्रांत कंपनी कार्यरत आहे.

या नियोजित अधिग्रहणामुळे फिडेलच्या ग्राहकवर्गात, वितरण क्षमतेत आणि भौगोलिक विस्तारात वाढ होणार आहे. तसेच अनुभवी आयटी व्यावसायिकांचे मनुष्यबळ, प्रस्थापित ग्राहक संबंध आणि आयटी इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थापनातील कौशल्य उपलब्ध होणार आहे. क्रॉस सेलिंग, कार्यान्वयन समन्वय आणि व्यवस्थापित सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित ऑटोमेशनचा वापर वाढविण्याच्या संधीही निर्माण होणार आहेत.

अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर फिडेलचे जपानमधील उद्योगक्षेत्रातील अस्तित्व, बहुभाषिक क्षमता आणि डिजिटल परिवर्तनातील कौशल्य यांना सॉफ्टेंजरच्या पायाभूत सुविधा व व्यवस्थापित सेवांच्या क्षमतेची जोड मिळणार आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर एकात्मिक तंत्रज्ञान सेवा समूह म्हणून कंपनीचे स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न आहे.

महसूलवाढीसाठी महत्त्वाचे पाऊल : सुनील कुलकर्णी

फिडेल सॉफ्टटेकचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी म्हणाले, सॉफ्टेंजर आणि तिच्या समूह कंपन्यांचे नियोजित अधिग्रहण हे फिडेलच्या विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचे पाऊल आहे. गेल्या काही वर्षांत नैसर्गिक वाढ आणि धोरणात्मक अधिग्रहणाच्या माध्यमातून आम्ही कंपनीच्या क्षमता सातत्याने वाढवल्या आहेत. या अधिग्रहणामुळे विस्तारित कार्यक्षेत्र, अनुभवी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि विविध बाजारपेठांमधील प्रस्थापित ग्राहक संबंधांचा लाभ मिळणार आहे.

'स्टार्टअप सक्सेस जर्नी'तून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि आयबीएमआरचा संयुक्त उपक्रम; नवकल्पनांचे व्यवसायात रूपांतर करण्याबाबत मार्गदर्शन

■ पिंपरी : प्रतिनिधी

नोकरीच्या संधींच्या मागे धावण्याऐवजी स्वतःचा उद्योग उभारण्याची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी, तसेच नवकल्पनांना व्यावसायिक स्वरूप देण्याचे कौशल्य आत्मसात करता यावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च (आयबीएमआर), वाकड यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड एंटरप्राइज (सीआयमायई) आणि इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, पूना संचालित आयबीएमआर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्ट-अप टॉक सिरीज २.०' अंतर्गत 'स्टार्टअप सक्सेस जर्नी : फ्रॉम आयडिया, इनोव्हेशन टू इम्पॅक्ट' या विषयावर हे सत्र पार पडले.

या वेळी प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट येथील स्टार्टअप, इनक्युबेशन अँड इनोव्हेशन विभागाचे प्रमुख प्रा. गुरुराज



डांगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्टार्टअपची संकल्पना, छोट्या कल्पनेतून मोठा व्यवसाय उभारण्याची प्रक्रिया आणि नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतर करण्याच्या विविध पद्धती त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केल्या. नवीन उद्योग सुरू करताना येणारी आव्हाने, व्यवसायाचा विस्तार, बाजारपेठेतील स्पर्धा आणि दीर्घकालीन यशासाठी आवश्यक व्यावसायिक रणनीती यांची माहितीही त्यांनी दिली. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ नोकरी मिळविण्यापुरता विचार न करता रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनण्याची मानसिकता विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असे आवाहन प्रा. डांगरे यांनी केले. यशस्वी स्टार्टअप उभारण्यासाठी नावीन्यपूर्ण विचार, नेतृत्वगुण, योग्य नियोजन, कौशल्ये आणि जोखीम स्वीकारण्याची तयारी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या विविध संधी, नवकल्पनांचे व्यावसायिक महत्त्व आणि उद्योग उभारणीसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती मिळाली. एमबीए आणि एमसीए अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वक्त्यांशी संवाद साधत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाला आयबीएमआरचे प्रभारी संचालक डॉ. सचिन मिसाळ यांच्यासह संस्थेतील प्राध्यापक उपस्थित होते.

६० ते ७० नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्या आर्या कांबळेला शौर्य पुरस्कार द्या!

आमदार अमित गोरखे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे आग्रही मागणी

■ पिंपरी : प्रतिनिधी

चापेकर चौक परिसरातील कुणाल मार्केट इमारतीत झालेल्या भीषण आग दुर्घटनेत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ६० ते ७० रहिवाशांचे प्राण वाचवणाऱ्या २० वर्षीय आर्या कांबळे हिला राज्य शासनाने अधिकृतपणे 'शौर्य पुरस्कार' प्रदान करावा, अशी मागणी भाजपचे विधान परिषद आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

२९ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास चापेकर चौक परिसरातील कुणाल मार्केट इमारतीच्या पार्किंगमध्ये अचानक आग लागली. या आगीत १७ दुचाकी आणि चार चारचाकी वाहने जळून खाक झाली. मध्यरात्रीच्या वेळी आगीचा धूर आणि ज्वाळा वेगाने पसरल्याने इमारतीतील ६० ते ७० रहिवाशांचा जीव धोक्यात आला होता. अनेक नागरिक गाढ झोपेत असल्याने त्यांना परिस्थितीची कल्पनाही नव्हती.

पायाला गंभीर दुखापत होऊनही नागरिकांना वाचवले या संकटाच्या



प्रसंगी अवघ्या २० वर्षांच्या आर्या कांबळे हिने विलक्षण प्रसंगावधान आणि धाडस दाखवले. घराचे दार उघडत नसतानाही तिने सर्वप्रथम अग्निशमन दलाशी संपर्क साधला. त्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पहिल्या मजल्यावरील गॅलरीतून थेट खाली उडी मारली. या उडीमध्ये तिच्या पायाला गंभीर दुखापत झाली. मात्र, स्वतःच्या वेदनांची पर्वा न करता तिने संपूर्ण इमारतीत धाव घेतली. गाढ झोपेत असलेल्या रहिवाशांना जागे करून सुरक्षिततेसाठी गच्चीवर जाण्याच्या सूचना दिल्या. तिच्या या धाडसामुळे ६० ते ७० नागरिकांचे प्राण वाचले.

शौर्याची शासनाने दखल घ्यावी

आर्या कांबळे हिने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दाखवलेले धाडस आणि समयसूचकता संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानास्पद आहे. तिच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली असून अनेक नागरिकांना नवजीवन मिळाले आहे.

अशा प्रेरणादायी साहसी कृत्याची राज्य शासनाने तातडीने दखल घ्यावी आणि आर्या कांबळे हिला अधिकृत 'शौर्य पुरस्कार' देऊन गौरवावे, अशी आग्रही मागणी आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

सारांश वृत्त

सिद्धराज बाणखेलेची जलतरण स्पर्धेसाठी राज्यस्तरावर निवड!

विभागीय स्पर्धेत तीन पदकांची कमाई; दोन सुवर्ण आणि एका रौप्य पदकावर मोहोर



लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथील श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी सिद्धराज श्रीकांत बाणखेले याने जलतरण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. बीड येथे झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत त्याने एका दिवसात तीन प्रकारांत सहभाग घेत दोन सुवर्ण आणि एक रौप्य अशी एकूण तीन पदके पटकावली. १९ वर्षांखालील मुलांच्या गटातील विभागीय जलतरण स्पर्धेत सिद्धराजने २०० मीटर फ्रीस्टाइल प्रकारात उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्याला सुवर्णपदकासह अन्य दोन स्पर्धा प्रकारांतही पदके मिळाली. या कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सिद्धराजला विद्यालयाचे क्रीडाशिक्षक तानाजी फुलमाळी, प्रा. शिवदत्त जोरी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डी. एन. खाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याला प्रोत्साहन दिले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सिद्धराजचे अभिनंदन करण्यात आले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्याच्या यशाचे कौतुक करून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दमदार पावसाने रब्बी हंगामाला दिलासा; कांदा लागवडीसाठी पोषक वातावरण

खरीप पिकांचे नुकसान, मात्र गहू, ज्वारी, हरभरा पेरणीसाठी शेतकऱ्यांना दिलासा; जमिनीत ओलावा वाढला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

घोडेगाव : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या बहुतांश भागांत झालेल्या दमदार, तर काही भागांत झालेल्या भिज पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. दोन दिवसांच्या पावसाने जमिनीत ओलावा आणि गारवा निर्माण झाल्याने गहू, ज्वारी, हरभरा पेरणीसह कांदा लागवडीला चालना मिळणार आहे. त्यामुळे खरीप हंगामातील नुकसानीने चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

आंबेगाव तालुक्यात रब्बी हंगामात गहू, हरभरा, ज्वारी या अन्नधान्य पिकांसह बटाटा, कोबी, फ्लॉवर आणि कांदा या नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील अनेक पिकांचे नुकसान झाले असून भात उत्पादनातही घट झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा आणि



भाजीपाला पिकांच्या पेरणी व लागवडीसाठी जमिनीत पुरेशा ओलाव्याची आवश्यकता होती. तालुक्यात कांद्याची लागवड काही भागांत सुरू झाली असून, अलीकडील पावसामुळे त्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. जमिनीतील गारवा आणि वाढलेला ओलावा कांदा लागवडीसाठी फायदेशीर ठरणार आहे.

मात्र, शेतकऱ्यांसमोरील अडचणी अद्याप कायम आहेत. सतत खंडित होणारा वीजपुरवठा, वाढता उकाडा आणि सातगाव पठारासह तालुक्याच्या पूर्व भागातील विहिरींनी गाठलेला तळ यामुळे सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

एकीकडे खरीप हंगामातील पिकांना पावसाअभावी फटका बसला असताना, दुसरीकडे रब्बी हंगामासाठी झालेल्या पावसाने आशेचे वातावरण निर्माण केले आहे. गहू, ज्वारी आणि हरभरा पेरणीसाठी जमिनीतील ओलावा अनुकूल ठरल्याने शेतकरी आता रब्बी हंगामाच्या तयारीला लागले आहेत.

विद्यापीठाच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्याने डॉ. डी. वाय. पाटील अॅकॅडमीविरोधात आंदोलनाचा इशारा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न केल्याचा आरोप करत अखिल भारतीय हिंदू मातंग संघाने डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशनल अॅकॅडमी, आंबी (ता. मावळ) विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित संस्थेने सात दिवसांत आदेशाचे पालन न केल्यास संस्थेच्या प्रवेशद्वारावर बेमुदत आंदोलन छेडण्यासह मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा संघाचे संस्थापक प्रमुख लोकसेवक युवराज दाखले यांनी दिला आहे.

याप्रकरणी दाखले यांनी पुणे जिल्हाधिकारी, राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

दहा वर्षे सेवा करूनही कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान

संघाने दिलेल्या तक्रारीनुसार, संस्थेत नॉन-टीचिंग कर्मचारी म्हणून सतीश शांताराम राजगुरू आणि गणेश सूर्यकांत लाळगे हे सुमारे दहा वर्षे कार्यरत होते. मात्र, कोणतीही पूर्वसूचना किंवा चौकशी न करता त्याना सेवेतून कमी करण्यात आले. तसेच दोन महिन्यांचे वेतन, ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधीतील फरक आणि अन्य वेतनविषयक लाभ अद्याप देण्यात आलेले नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे.

या अन्यायाविरोधात संबंधित कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ७९ अन्वये स्थापन विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे प्रकरण क्रमांक ०९/२०२२ आणि ०८/२०२२ अंतर्गत दाद मागितली होती. समितीने १६ एप्रिल २०२४ रोजी कर्मचाऱ्यांच्या बाजूने आदेश दिला. मात्र, दीड वर्ष उलटूनही संस्थेने त्याची अंमलबजावणी केली नसल्याचा दावा संघाने केला आहे.

संलग्नता निलंबित करण्याची मागणी

विद्यापीठाच्या आदेशानुसार दोन्ही कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन आणि सर्व आर्थिक लाभ तातडीने द्यावेत, आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल संस्थेची संलग्नता निलंबित करून दंडात्मक कारवाई करावी, तसेच सात दिवसांत अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशा मागण्या संघाने केल्या आहेत. आदेशाची पूर्तता होईपर्यंत संस्थेचे शासकीय अनुदान आणि नवीन अभ्यासक्रमांच्या मान्यतेलाही स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

आंबेगावच्या पूर्व भागात परतीच्या पावसाची हजेरी; रब्बी हंगामाच्या आशा पल्लवित!

ज्वारी, हरभरा आणि गव्हाच्या पेरणीला मिळणार बळ; उन्हाळ्यातील चारा टंचाईचा प्रश्नही सुटण्याची आशा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

लोणी-धामणी : प्रतिनिधी

यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. त्यातच गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून परतीच्या पावसाने या भागात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे रब्बी हंगामाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून ज्वारी, हरभरा आणि गव्हाच्या पेरणीला पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, शिरदाळे, पहाडदरा, मांदळेवाडी आणि वडगावपीर ही गावे प्रामुख्याने कोरडवाहू क्षेत्रात येतात. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या हातात खरीप हंगामाचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी आले. त्यानंतर दीर्घकाळ पाऊस न झाल्याने रब्बी हंगामाच्या पेरणीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली होती.

आता झालेल्या परतीच्या पावसामुळे आधीच पेरणी केलेल्या ज्वारी पिकाला नवसंजीवनी मिळाली आहे. पिकाच्या वाढीसाठी आवश्यक ओलावा उपलब्ध झाल्याने ज्वारीचे पीक चांगले येण्याची आशा शेतकऱ्यांना आहे. ज्वारीचे धान्य मिळण्याबरोबरच जनावरांसाठी कडबा उपलब्ध होण्यासही या पावसाचा फायदा होणार आहे. त्यामुळे उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या चारा टंचाईची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे.

बटाटा आणि सोयाबीनची काढणी झाल्यानंतर काही शेतकरी ज्वारीची नव्याने पेरणी करण्याच्या तयारीत आहेत. तसेच हरभरा आणि गव्हाच्या पेरणीसाठीही जमिनीत ओलावा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, पिकांच्या वाढीसाठी आगामी काळात आणखी एखादा चांगला पाऊस होणे आवश्यक असल्याचे जाणकार शेतकरी सांगत आहेत.

यंदाचा खरीप हंगाम कसा तरी पार पडला; आता रब्बी हंगाम तरी हातात यावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. परतीचा पाऊस झाला नसता तर ज्वारीचे पीक घेणेही कठीण झाले असते. किमान ज्वारीचे पीक हाती आल्यास जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. धान्याचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे मिळाले नाही, तरी ज्वारीचा कडबा जनावरांसाठी उपयोगी ठरणार आहे.

उशिरा का होईना, परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने पूर्व भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, हा दिलासा कायम राहण्यासाठी आणखी पावसाची गरज आहे. त्यामुळे आता आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या यशस्वी उत्पादनाची आशा लागली आहे.

सोलापूरच्या तत्कालीन कृषी उपसंचालकासह पत्नीविरुद्ध अपसंपदेचा गुन्हा दाखल

४ कोटी ३७ लाख ८४ हजारांची बेहिशेबी मालमत्ता; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

पुणे : (प्रतिनिधी)

सोलापूर येथील तत्कालीन कृषी उपसंचालक तथा गुणनियंत्रण व खते विभागाचे तत्कालीन संचालक किरण श्यामराव जाधव आणि त्यांच्या पत्नी संगीता किरण जाधव यांच्याविरुद्ध उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा ४ कोटी ३७ लाख ८४ हजार ९३० रुपयांची (१२८.७ टक्के) अधिक अपसंपदा जमा केल्याप्रकरणी भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी ही कारवाई केली.

या प्रकरणातील तक्रारदार म्हणून अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील यांनी काम पाहिले. किरण जाधव हे सोलापूर येथील आत्मा (अद्ययअ) प्रकल्प कार्यालयात प्रकल्प संचालक तसेच कृषी विभागातील विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत होते.

प्राप्त माहितीनुसार, किरण जाधव यांच्या विरोधात २ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याच्या कृषी विभागाच्या महासंचालकांकडून उघड चौकशीचे आदेश प्राप्त झाले होते. त्यानुसार ४ जून १९९४ ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीतील त्यांच्या उत्पन्नाच्या स्रोतांची आणि मालमत्तेची तपासणी करण्यात आली.

या चौकशीत जाधव यांनी ज्ञात उत्पन्नाच्या तुलनेत ४ कोटी ३७ लाख ८४ हजार ९३० रुपयांची अतिरिक्त मालमत्ता जमा केल्याचे निष्पन्न झाले. ही मालमत्ता त्यांच्या वैध उत्पन्नाच्या १२८.७ टक्के असल्याचे चौकशीत समोर आले आहे.

विशेष म्हणजे, ही बेहिशेबी मालमत्ता भ्रष्ट मार्गाने संपादित करण्यासाठी पत्नी संगीता जाधव यांनी पतीला अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनाही या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे.

याप्रकरणी पुणे शहरातील बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलम १३ (१)(ई), १३(२), तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक सुधारित अधिनियम २०१८ मधील कलम १३(१)(ब), १३(२) आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास अपर पोलीस अधीक्षक अर्जुन भोसले करीत असून, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केल्यास अथवा भ्रष्टाचारासंबंधी माहिती असल्यास विभागाशी संपर्क साधावा.

आंबेगाव तालुक्यासाठी जिल्हा परिषद निधीतून १ कोटी ६० लाख मंजूर

विवेक वळसे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश; १८ विकासकामांना मिळणार गती

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

मंचर : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते, क्रीडांगणे, संरक्षक भिंती आणि सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी जिल्हा परिषद निधीतून सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १८ विकासकामांना मंजुरी मिळाली आहे. माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या पाठपुराव्यातून हा निधी उपलब्ध झाल्याची माहिती त्यांनी दिली.

मंजूर कामांमध्ये पारगाव आणि जारकरवाडी येथे प्रत्येकी १० लाख रुपये खर्चून क्रीडांगणांचा विकास करण्यात येणार आहे. पहाडदरा येथे जिल्हा परिषद शाळा ते वायकर निवास रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी ५ लाख, धामणी मधलामळा रस्त्यासाठी १० लाख, पांढवाडी नवलवस्ती रस्त्यासाठी १० लाख आणि रानमळा अंतर्गत रस्त्यांसाठी ७ लाख रुपये मंजूर झाले आहेत. वडगावपीर येथे मांदळेवाडी रोड ते तुकाराम आडक घर केटीवेअर रस्त्यासाठी १० लाख, वाळुंजनगर कानसकरवस्ती ते साविंदणे शिव रस्त्यासाठी १० लाख, निरगुडसर (बेलसरवाडी) येथील नारखदेव-टेंभकरमळा रस्त्यासाठी ८ लाख आणि जवके येथे शिंगवे-भराडी रोड ते साईमंदिर-बोराटेवस्ती रस्त्यासाठी १० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. लाव्हणगाव येथील राजोबा पाझर तलाव ते दांडकरवस्ती रस्त्याच्या कामासाठीही १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पिंपळगाव येथे भक्ताचा मळा ते मधलामळा ग्रामरस्ता क्रमांक १३५ वर संरक्षक भिंत बांधण्यासाठी ९.९९ लाख रुपये, पारगाव खेड येथे ग्रामपंचायत परिसर सुधारण्यासाठी ९.९९ लाख आणि अवसरी बुद्रुक येथील नाना-नानी पार्कमध्ये डायनिंग हॉल व संरक्षक भिंत बांधण्यासाठी ९.९९ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

याशिवाय नानवडे हिलेवस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १० लाख, आमोंडी भैरवनाथवस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी ५ लाख, राजापूर पालेखेवाडी येथे पत्राशेड बांधण्यासाठी ५ लाख आणि जांभोरी माचीचीवाडी येथे आखाडा बांधण्यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि ग्रामस्थांनी केलेल्या मागण्यांचा विचार करून जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत या १८ विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे.

रस्त्यांची सुधारणा, क्रीडांगणांचा विकास आणि सार्वजनिक सुविधांच्या बळकटीकरणामुळे गावांच्या विकासाला चालना मिळणार आहे. मंजूर कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण होण्यासाठी ग्रामस्थांनीही सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी केले.

आंबेगाव तालुक्यात जलव्यवस्थापनासाठी ९४ लाखांचा निधी मंजूर

विहिरी, सोलर पंप, वॉटर एटीएम, आरओ प्लांटसह पाणी वितरण व्यवस्थेची कामे होणार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

मंचर : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या समस्या दूर करण्यासाठी आणि जलस्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी एकात्मिक जलव्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ९४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा बांधकाम विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी हा निधी उपलब्ध झाला आहे. माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निधी मंजूर झाल्याची माहिती जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी दिली.

या निधीतून तालुक्यातील विविध गावांमध्ये सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरींचे बांधकाम, विहिरींना आडवे बोअर घेणे, सोलर पंप बसविणे, वॉटर एटीएम आणि आरओ प्लांट उभारणे, पाण्याच्या साठवण टाक्या बांधणे तसेच पाणी वितरण व्यवस्था व गटारांची कामे करण्यात येणार आहेत.

मंजूर कामांमध्ये डिंभे खुर्द येथील सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरीला आडवे बोअर घेण्यासाठी ३.५० लाख रुपये, चपटेवाडी येथे सोलर पंपासाठी ४.५० लाख, डिंभे बुद्रुक येथे वॉटर एटीएम मशीनसाठी ४.५० लाख, तिरपाड आंबवणे वस्ती येथे सार्वजनिक विहीर बांधण्यासाठी ३ लाख आणि शिनोली येथे पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्यासाठी ३ लाख रुपये मंजूर झाले आहेत. लाव्हणगाव येथे सार्वजनिक विहिरीपासून प्राथमिक आरोग्य उपकेंद्रापर्यंत पाणी वितरण व्यवस्था उभारण्यासाठीही ३ लाख रुपये देण्यात आले आहेत.



निरगुडसर येथील दशक्रिया घाट परिसरात २५ हजार लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधण्यासाठी १३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. निरगुडसर (बेलसरवाडी) येथील टेंभकर-टाकळकरवस्ती येथे गटारकामासाठी ६ लाख, धामणी पंचारासवस्ती येथे पाणी वितरण व्यवस्थेसाठी ७ लाख आणि शिंगवे शेरिमळा व एकलहरे शिंदेवाडी येथे गटारकामासाठी प्रत्येकी ५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

अवसरी बुद्रुक येथील खालचा शिवार तसेच यशोदिप मंगल कार्यालय ते प्राजिमा १३ शिरूर रोड या ठिकाणी गटारकामासाठी प्रत्येकी १ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वाळुंजवाडी आणि पारगाव खेड येथील गंगोबावाडी येथे आरओ प्लांट उभारण्यासाठी प्रत्येकी २.५० लाख रुपये मंजूर झाले आहेत.

याशिवाय शिरूर तालुक्यातील कोंढर येथील जिल्हा परिषद शाळा पाचवडवस्ती येथे पाणी वितरण व्यवस्थेसाठी ८ लाख, तर बाबुळसर खुर्द येथे गावठाण वेशीजवळ गटार बांधकामासाठी ५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

स्थानिक मागण्यांना प्राधान्य

ग्रामीण भागातील सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या समस्या लक्षात घेऊन स्थानिक नागरिकांनी केलेल्या मागण्यांनुसार या कामांना प्राधान्याने मंजुरी देण्यात आली आहे. मंजूर निधीचा योग्य विनियोग करून सर्व कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत. यासाठी ग्रामस्थांनीही सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी केले.

सारांश वृत्त

मंझरी फाट्यावर उड्डाणपुलाची आशा; गडकरींचा १५ मिनिटांत सर्वेक्षणाचा आदेश!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

बीड-सोलापूर महामार्गावरील मंझरी हवेली फाटा अपघातांचा सापळा बनला असताना अखेर उड्डाणपुलाच्या मागणीला केंद्र सरकारकडून प्रतिसाद मिळाला आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याची मागणी केली. विशेष म्हणजे, त्यांच्या पत्रावर अवघ्या पंधरा मिनिटांत कार्यवाहीचे निर्देश देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

बीड-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील मंझरी हवेली फाटा हा अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे. येथे वारंवार अपघात होत असल्याने स्थानिक नागरिकांकडून उड्डाणपुलाची मागणी केली जात होती. गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेंद्र गुजर यांच्या विनंतीनंतर पंकजा मुंडे यांनी हा प्रश्न थेट गडकरी यांच्यासमोर मांडला.

गडकरी यांनी संबंधित विभागाला तातडीने निर्देश दिले. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने उड्डाणपुलाच्या सर्वेक्षणाचे आदेश देत २०२६-२७ च्या प्रकल्प आराखड्यात समावेशाची प्रक्रिया सुरू असल्याचे कळवले.

दरम्यान, पंकजा मुंडे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचीही भेट घेतली. बीड-परळी रेल्वेमार्गाचे काम वेगाने पूर्ण करण्यासह मुंबई-लातूर, मछलीपट्टणम-बिदर आणि हैदराबाद-बिदर रेल्वेसेवा परळीपर्यंत विस्तारित करण्याची मागणी त्यांनी केली.

मात्र, आदेश आणि प्रत्यक्ष उभारणी यातील अंतर मोठे असते. त्यामुळे बीडकरांना आता घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कामाची प्रतीक्षा आहे.

प्रयोगशाळेतील प्राण्यांच्या सुरक्षेवर केंद्राचा नवा प्रस्ताव; १८ हजारांहून अधिक नागरिकांचा विरोध, सेलिब्रिटींपासून शास्त्रज्ञांपर्यंत आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

प्रयोगशाळांमध्ये संशोधन आणि चाचण्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या सुरक्षेसंदर्भात केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या नव्या नियमांवरून देशात वाद निर्माण झाला आहे. केंद्र सरकारच्या 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक (प्रयोग, प्रजनन आणि प्रयोगशाळेतील प्राण्यांचा व्यापार यांचे नियंत्रण व पर्यवेक्षण) नियम, २०२६' या मसुद्याला सेलिब्रिटी, राजकीय नेते, शास्त्रज्ञ, पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि प्राणी कल्याण संस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. हा मसुदा मागे घेण्याच्या मागणीसाठी आतापर्यंत १८ हजारांहून अधिक नागरिकांनी याचिकेवर स्वाक्षऱ्या केल्याची माहिती पेटा इंडियाने दिली आहे.

भिनेता जॉन अब्राहम, तब्बू, हेमा मालिनी, रवीना टंडन, शिल्पा शेट्टी, जॅकलिन फर्नांडिस, दिया मिर्झा, रुपाली गांगुली आणि वामिका गब्बी यांच्यासह अनेक कलाकारांनी या मोहिमेला पाठिंबा दिला आहे. भारतीय क्रिकेटपटू के. एल. राहुल यानेही या प्रस्तावाविरोधातील भूमिकेला समर्थन दिले आहे.

पेटा इंडियाच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित नियम सध्याच्या स्वरूपात अधिसूचित झाले, तर प्रयोगशाळांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांसाठी अस्तित्वात असलेली संरक्षणात्मक व्यवस्था कमकुवत होऊ शकते. सध्या लागू असलेल्या 'प्राण्यांचे प्रजनन आणि प्रयोग (नियंत्रण व पर्यवेक्षण) नियमां'च्या जागी हे नवे नियम आणण्याचा केंद्राचा प्रस्ताव आहे.

विशेष चिंता वन्यजीव आणि भटक्या प्राण्यांच्या संरक्षणाबाबत व्यक्त केली जात आहे. नव्या तरतुदींमुळे संरक्षित वन्यजीवांना पकडून प्रयोगांसाठी वापरण्याचे प्रमाण वाढू शकते. तसेच काही विशिष्ट परिस्थितींमध्ये समुदायातील कुत्रे आणि मांजरींनाही प्रयोगशाळांमध्ये वापरण्याची परवानगी मिळू शकते, असा दावा पेटा इंडियाने केला आहे.

वैज्ञानिक संशोधनाच्या नावाखाली प्राण्यांच्या संरक्षणाशी तडजोड होऊ नये, ही आंदोलकांची प्रमुख भूमिका आहे. संशोधनासाठी पर्यायी तंत्रज्ञान आणि प्राण्यांचा वापर टाळणाऱ्या पद्धतींना प्रोत्साहन देण्याची गरजही या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.

आता १८ हजारांहून अधिक नागरिकांच्या विरोधानंतर केंद्र सरकार या मसुद्याबाबत काय भूमिका घेते, याकडे प्राणी कल्याण क्षेत्राचे लक्ष लागले आहे. वैज्ञानिक संशोधन महत्त्वाचे असले, तरी त्यासाठी प्राण्यांच्या मूलभूत संरक्षणाची किंमत मोजावी लागणार का, हा प्रश्न या वादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

संविधान वाचवण्याची हाक म्हणजे सत्तापालटाचे कारस्थान? फडणवीसांचा विरोधकांवर गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

संविधान वाचवण्याच्या नावाखाली काँग्रेस आणि राहुल गांधी देशातील लोकशाही व्यवस्था आणि घटनात्मक संस्था उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. विरोधकांच्या राजवट बदलण्याच्या मोहिमेमागे खोलवर रचलेले कारस्थान असल्याचा दावा करत त्यांनी सोमवारी भाजपच्या लोकशाही आणि संविधान वाचवा रॅलीत आक्रमक भूमिका मांडली.

बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेतील राजकीय उलथापालथींचा संदर्भ देत फडणवीस यांनी भारतातही अशाच प्रकारचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप केला. विरोधक जाणीवपूर्वक लोकांचा घटनात्मक संस्थांवरील विश्वास कमी करत असल्याचे ते म्हणाले.

लोकशाहीमध्ये सरकार बदलण्याचा अधिकार जनतेला आहे. मात्र, राजवट बदलण्याच्या नावाखाली राजकीय व्यवस्था, संविधान आणि देशातील संस्था बदलण्याचा प्रयत्न मान्य केला जाणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

'आमच्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आम्ही राजवट बदलू देणार नाही. संविधानाला हात लावू देणार नाही,' असा इशाराही त्यांनी दिला.

उद्धव ठाकरे यांनीही राजवट बदलण्याच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याचा उल्लेख करत फडणवीस यांनी त्यांच्यावर टीका केली.

मात्र, विरोधकांच्या आंदोलनाला आंतरराष्ट्रीय कारस्थानाशी जोडणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या आरोपांचे ठोस पुरावे कोणते, हे स्पष्ट केलेले नाही.

त्यामुळे संविधानाच्या संरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

दिल्ली पोलिसांतच बंडाची ठिणगी! वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदलीविरोधात १०० पोलिसांचा मुख्यालयाबाहेर निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र
दिल्ली : प्रतिनिधी

शाहदरा पोलीस ठाण्यातील वकिलासोबत च्या झटापटीचे पडसाद; एसीपी मनस्वी वशिष्ठ आणि निरीक्षक अरुण कुमार यांची पुर्वीच्या पदांवर पुनर्नियुक्ती करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

नवी दिल्ली : दिल्लीतील शाहदरा पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी आणि वकिलामध्ये झालेल्या कथित झटापटीचे पडसाद आता पोलीस दलातही उमटू लागले आहेत. या प्रकरणानंतर बदली करण्यात आलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ सोमवारी (२ नोव्हेंबर) सुमारे १०० पोलीस कर्मचारी दिल्ली पोलीस मुख्यालयाबाहेर एकत्र आले. एसीपी मनस्वी वशिष्ठ आणि शाहदरा पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक अरुण कुमार यांची पूर्वीच्या पदांवर पुनर्नियुक्ती करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनात महिला पोलीस कर्मचाऱ्यांचाही सहभाग होता. हातात फलक आणि पोस्टर घेऊन पोलिसांनी बदलीच्या निर्णयाविरोधात निषेध नोंदवला. पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदलीवरून खुद्द पोलीस कर्मचारी रस्त्यावर उतरल्याने या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या संपूर्ण वादाची सुरुवात २३ ऑक्टोबर २०२६ रोजी झाली. शाहदरा पोलीस ठाण्यात झालेल्या झटापटीत एका वकिलाच्या डोक्याला दुखापत झाल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर वकील संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली. संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी जिल्हा न्यायालयातील वकिलांनी बेमुदत संप पुकारला. वकिलांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २८ ऑक्टोबर रोजी एसीपी मनस्वी वशिष्ठ आणि निरीक्षक अरुण कुमार यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले. मात्र, या निर्णयाला आता पोलीस कर्मचाऱ्यांकडूनच विरोध होत आहे.

एका बाजूला वकिलांचा बेमुदत संप, तर दुसऱ्या बाजूला बदलीविरोधात पोलिसांचे आंदोलन, अशी दुहेरी परिस्थिती दिल्लीच्या पोलीस व्यवस्थेसमोर निर्माण झाली आहे.

या प्रकरणात वकिलाला झालेल्या दुखापतीची जबाबदारी निश्चित करणे, संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी आणि बदलीच्या निर्णयामागील प्रशासकीय कारणे स्पष्ट करणे महत्त्वाचे ठरणार आहे. पोलीस दलातील अंतर्गत असंतोष आणि न्यायालयीन कामकाजावर परिणाम करणारा वकिलांचा संप यामुळे दिल्लीतील या संघर्षाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सक्तीच्या वसुलीविरोधात संतापाचा उद्रेक; नांदेडमध्ये श्रीराम आणि बजाज फायनान्सच्या कार्यालयांची तोडफोड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नांदेड / प्रतिनिधी

दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना कर्जवसुलीच्या नावाखाली शेतकरी आणि महिलांचा छळ सुरू असल्याच्या आरोपांमुळे संतापाचा उद्रेक झाला आहे. नांदेडमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी श्रीराम फायनान्स आणि बजाज फायनान्सच्या कार्यालयांची तोडफोड केल्याची घटना २ नोव्हेंबर रोजी घडली. या प्रकारामुळे खासगी वित्तसंस्थांच्या वसुली पद्धतींविरोधातील संघर्ष चिघळण्याची चिन्हे आहेत.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी ही तोडफोड केल्याचे वृत्त आहे. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी यापूर्वीच सक्तीच्या वसुलीविरोधात आक्रमक इशारा दिला होता. शेतकऱ्यांच्या दारात जाऊन जबरदस्ती केल्यास फायनान्स कंपन्यांची कार्यालये शिल्लक ठेवणार नाही, असा इशारा त्यांनी दिला होता.



नांदेडचे चंद्रकांत शिंदे आणि लातूरचे दत्तात्रय कुंभार या शेतकऱ्यांच्या मृत्यूमागे मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या वसुलीचा दबाव असल्याचा आरोप करण्यात आला होता. तुपकर यांनी दोन्ही कुटुंबांची भेट घेऊन सांत्वन केले होते.

दुष्काळ, पीकनुकसान आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांकडून वसुलीच्या नावाखाली दबाव टाकला जात असल्याचा आरोप गंभीर आहे. मात्र, कार्यालयांची तोडफोड हा प्रश्न सोडवण्याचा मार्ग नाही.

आता सरकारने सक्तीच्या वसुलीच्या तक्रारींची चौकशी करून शेतकऱ्यांना संरक्षण देण्याची गरज आहे

नेपाळमध्ये हिमवृष्टीच्या तडाख्यात सहा भारतीय पर्यटक अडकले; हेलिकॉप्टरद्वारे सुखरूप सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र
काठमांडू : प्रतिनिधी

नेपाळमधील प्रसिद्ध शे-फोक्सुंडो राष्ट्रीय उद्यान परिसरात जोरदार हिमवृष्टीमुळे अडकलेल्या सहा भारतीय पर्यटकांची सोमवारी (२ नोव्हेंबर २०२६) खासगी हेलिकॉप्टरच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. या पर्यटकांमध्ये दोन महिला आणि चार पुरुषांचा समावेश आहे. दुर्गम पर्वतीय भागात अचानक झालेल्या हिमवृष्टीमुळे त्यांचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला होता.

नेपाळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सहा भारतीय पर्यटक १ नोव्हेंबरपासून संपर्काबाहेर होते. शे-फोक्सुंडो राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी झाल्याने त्यांना पुढील प्रवास करणे अशक्य झाले. प्रतिकूल हवामान आणि दुर्गम भौगोलिक परिस्थितीमुळे त्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता निर्माण झाली होती.

डोल्पा जिल्हा पोलीस कार्यालयाचे प्रवक्ते आणि पोलीस निरीक्षक बिनय सिंह यांनी या बचावकार्याची माहिती दिली. सोमवारी सकाळी खासगी हेलिकॉप्टरच्या माध्यमातून सहाही पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

सुटका करण्यात आलेल्या सर्व पर्यटकांना डोल्पा जिल्ह्यातील दुन येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात



आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

नेपाळमधील हिमालयीन भागात पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांना बदलत्या हवामानाचा मोठा धोका असतो. विशेषतः नोव्हेंबर महिन्यात उंच पर्वतीय प्रदेशात तापमानात मोठी घट होते आणि अचानक हिमवृष्टीमुळे रस्ते व पायवाटा बंद होऊ शकतात. अशा परिस्थितीत पर्यटकांचा संपर्क तुटणे आणि बचावकार्य कठीण होणे, या समस्या निर्माण होतात.

या घटनेत वेळेत बचावकार्य झाल्याने सहाही भारतीय पर्यटकांचे प्राण वाचले. मात्र, हिमालयीन पर्यटनादरम्यान हवामानाचा अंदाज, स्थानिक प्रशासनाशी संपर्क आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणे किती धोकादायक ठरू शकते, हे या घटनेने पुन्हा अधोरेखित केले आहे.

आंतरराष्ट्रीय लवादाचा गवगवा कशासाठी? वेदांत प्रकरणात केंद्र सरकारला सर्वोच्च न्यायालयाचा दणका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करायची, भारताला जागतिक व्यापाराचे केंद्र बनवायचे, परदेशी गुंतवणूकदारांना कायद्याचे राज्य असल्याची हमी द्यायची आणि त्याच वेळी आंतरराष्ट्रीय लवादाने दिलेल्या निवाड्यांची अंमलबजावणी करण्याच्या वेळी मात्र सरकारी यंत्रणेनेच आडमुठेपणाची भूमिका घ्यायची! केंद्र सरकारच्या या दुटप्पी भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी, २ नोव्हेंबर २०२६ रोजी चांगलेच ताशेरे ओढले.

वेदांत लिमिटेड आणि रव्वा ऑइल (सिंगापूर) प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संबंधित जवळपास ९९ दशलक्ष डॉलर म्हणजेच सुमारे ८८० कोटी रुपयांच्या परदेशी लवाद निवाड्यांच्या अंमलबजावणीचा हा वाद आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने या दोन्ही कंपन्यांना संबंधित परदेशी लवाद निवाड्यांची भारतात अंमलबजावणी करण्याची परवानगी दिली होती. मात्र, केंद्र सरकारने या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

सोमवारी न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारचे आव्हान फेटाळून लावले. मात्र, न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका व्यावसायिक वादापुरता मर्यादित राहिला नाही. कारण या सुनावणीत न्यायालयाने सरकारच्या भूमिकेतील विसंगतीवरच बोट ठेवले.

भारताला आंतरराष्ट्रीय लवादासाठी पसंतीचे केंद्र बनवण्याची सरकारची महत्त्वाकांक्षा आहे. जागतिक गुंतवणूकदारांनी भारतात यावे, इथल्या कायदेशीर व्यवस्थेवर विश्वास ठेवावा, असे सरकारकडून सातत्याने सांगितले जाते. मग परदेशी लवादाने दिलेल्या निवाड्यांची अंमलबजावणी करण्याची वेळ येते, तेव्हा सरकारच विरोधात का उभे राहते, असा सवाल खंडपीठाने उपस्थित केला.

हा प्रश्न सरकारच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण जागतिक गुंतवणूकदार केवळ भारतातील बाजारपेठेचा आकार, स्वस्त मनुष्यबळ किंवा नफ्याच्या संधी पाहत नाहीत. गुंतवणुकीशी संबंधित वाद निर्माण झाल्यास न्याय किती लवकर मिळतो, करारांचे संरक्षण किती प्रभावीपणे होते आणि कायदेशीर निर्णयांची अंमलबजावणी किती निष्पक्षपणे होते, यालाही तितकेच महत्त्व असते.

सरकारनेच एखाद्या लवाद निवाड्याच्या अंमलबजावणीला विरोध केला आणि त्यासाठी दीर्घकाळ न्यायालयीन लढाई सुरू ठेवली, तर आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांनी भारताच्या न्यायव्यवस्थेबद्दल कोणता संदेश घ्यायचा? परदेशी कंपन्यांना भारतात व्यवसाय करताना करारांचे संरक्षण मिळेल, की सरकारी यंत्रणेच्या विरोधामुळे त्यांना वर्षानुवर्षे न्यायालयाचे दरवाजे ठोठावत बसावे लागेल?

हा प्रश्न केवळ वेदांत किंवा रव्वा ऑइलचा नाही. तो भारताच्या गुंतवणूकविषयक विश्वासार्हतेचा आहे.

विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय लवादाच्या माध्यमातून व्यावसायिक वाद सोडवण्याची व्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. अशा व्यवस्थेतील निवाडे अंमलात आणताना अनावश्यक विरोध आणि विलंब झाला, तर त्याची किंमत केवळ संबंधित कंपन्यांना मोजावी लागत नाही; देशाच्या व्यावसायिक विश्वासार्हतेवरही त्याचे परिणाम होतात.

सरकार एकीकडे 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'चा डंका वाजवते, दुसरीकडे गुंतवणूकदारांच्या कायदेशीर हक्कांच्या अंमलबजावणीच्या वेळी सरकारी यंत्रणाच अडथळा ठरत असेल, तर या घोषणांचा उपयोग तरी काय? गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी परिषदांचे आयोजन, मोठमोठ्या घोषणा आणि सामंजस्य करार पुरेसे नसतात. प्रत्यक्ष व्यवहारात कायद्याचा सन्मान होतो का, हेच महत्त्वाचे असते.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे आव्हान फेटाळून लावत केवळ एका आदेशाला मान्यता दिलेली नाही, तर सरकारच्या धोरणात्मक दाव्यांपुढे वास्तवाचा आरसा धरला आहे. भारताला आंतरराष्ट्रीय लवादाचे केंद्र बनवायचे असेल, तर सर्वप्रथम सरकारनेच न्यायालयीन आणि लवाद प्रक्रियेवरील विश्वास टिकवण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

जागतिक गुंतवणूकदारांना भारतात बोलवायचे आणि त्यांच्या कायदेशीर हक्कांच्या अंमलबजावणीच्या वेळी सरकारनेच आडवे यायचे, हा कसला गुंतवणूकरऱ्नेही कारभार? सर्वोच्च न्यायालयाचा सवाल सरकारसाठी केवळ कायदेशीर धक्का नाही, तर आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेबाबतचा गंभीर इशाराही आहे.